जा. क्र. माध्य-३/प्रथम मान्यता/पुणे/१९९
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय
दिनांक:- 29 AUG 1994

प्रति,
शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद- पुणे.

विषय:- प्रथम मान्यता
माध्यमिक विद्यालय, कोंदापूर, ता. वेल्हे.
संदर्भ :- आपले पत्र जा. क्र. शिक्षण/माध्य/ह-४/९३-९४ दि. १६/३/९४.

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३ अन्वये- राजगड ज्ञानपीठ, भोर. मराठी माध्यमिक शाळेच्या इ. ८वी/९वी/१०वी च्या वर्गास सन १९ ९३-९४. या शैक्षणिक वर्षासाठी जून १९९३ पासून मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्य] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करून पुढील मान्यतेचा वेळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबी अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करून द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित वर्ग उपलब्ध करून द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करून द्यावी.
८] वाढीव फीचे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजुर करूनघ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्य. शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून अद्यावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांचे भविष्य निर्वाह निधी खाते उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी करावी.
१३] विद्यार्थी संख्या पुरेशी वाढवावी.
१४]

करिता शि. उ. सं. पुणे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत - मुख्याध्यापक,
माध्यमिक विद्यालय, कोंदापूर, ता. वेल्हे.